# मुंबई विद्यापीठ

REG/ICC/2019-20/37

**परीपत्रक**

विषय : दिनांक १४ एप्रिल, २०२० पर्यंत अंतरिम उन्हाळी सुट्टी (Interim Summer Vacation) बाबत

महोदय/महोदया,

देशामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रार्दुभाव व त्या अनुषंगाने होणारे संक्रमण लक्षात घेता शासनाने दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत लॉकडाउन (Lockdown) घोषित केले होते व त्या अनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रकांद्वारे सर्व संबंधिताना कळविले देखिल होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून शासनाने दिनांक १४ एप्रिल, २०२० पर्यंत लॉकडाउन (Lockdown) घोषित केले आहे. तद्नुषंगाने मुंबई विद्यापीठ शैक्षणिक विभाग प्रमुख व शिक्षक / संचालक विद्यापीठ उपपरिसरे समन्वयक, आदर्श महाविद्यालये व संबंधित सर्व विद्यार्थ्यांना याद्वारे सुचित करण्यात येते की दिनांक ०१/०४/२०२० ते १४/०४/२०२० हा काळ विद्यापीठाने अंतरिम उन्हाळी सुट्टी म्हणून घोषित केला आहे.

उपरोक्त कालावधी जरी अंतरिम सुट्टीचा असला तरी उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षकांनी या कालावधी दरम्यान विद्यार्थ्यांना ऑनलाइन (online) पध्दतीने अध्यापनाचे कार्य सुरु ठेवणे अपेक्षित आहे. दरम्यानच्या काळात विद्यापीठ प्रशासकीय व शैक्षणिक विभाग प्रमुख, शिक्षकांच्या अत्यावश्यक सेवांची आवश्यकता विद्यापीठास भासल्यास त्यानुसार त्यांनी आपल्या सेवा प्रदान कराव्यात.

अंतरिम उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये विद्यापीठातील अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी घरी राहून (Work from Home) कार्य करतील. तथापि आवश्यकतेनुसार त्यांनी आपल्या सेवा बहाल करणे अपेक्षित आहे.

या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार सर्व संबंधिताना कळविण्यात येईल.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित विभाग प्रमुखांकडे सादर करावा. अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व इतर सेवा) पुरविणा—या प्रशासकीस विभाग प्रमुखांनी या बाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

मुंबई – ४०० ०३२ (डॉ. अजय देशमुख)
३१ मार्च २०२० कुलसचिव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही करीता :

सर्व प्रशासकीस विभाग प्रमुख, प्रभारी संचालक, सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, प्रभारी संचालक विद्यापीठ उपपरिपरे, समन्वयक, आदर्श महाविद्यालये, आरोग्य अधिकारी, सुरक्षा अधिकारी आणि अभियांत्रिकी विभाग